# दैनंदिन व्यवहार

५









## चला, शिकू या...

- स्वतःचा आणि इतरांचा दिनक्रम सांगणे
- मराठी वार
- १३ ते ५० अंक
- दैनंदिन व्यवहारातील गोष्टींविषयी बोलणे
- दिवसाच्या वेळा
- प्रश्नशब्द : केव्हा / कधी

# ५ दैनंदिन व्यवहार

## १ ऐकू या व चित्रांना क्रमांक देऊ या.

१



मी रोज सकाळी लवकर उठते.



मी चहा घेते.



मी घरीच व्यायाम करते.



मी दात घासते.



मी दुपारी कॅन्टीनमध्ये जेवते.



मी रोज सकाळी नाश्ता करते आणि एक फळही खाते.



मी ऑफिसला जाते.



मी रोज पोहायला जाते.



संध्याकाळी मी घरी येते.



मी रोज रात्री टी.व्ही. बघते.



मी रात्री वाचन करते.



मी रात्री लवकर झोपते.

## २ आता वरील वाक्ये क्रमाने लावू या.

**हा आहे प्रियाचा दिनक्रम.**

१. ती रोज सकाळी लवकर उठते...

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक/शिक्षिका** | उदा. **शिक्षक/शिक्षिका** |
| नाश्ता | मी नाश्ता करतो/करते. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| अभ्यास | मी अभ्यास करतो / करते. |
| काम | मी काम करतो / करते. |
| व्यायाम | मी व्यायाम करतो / करते. |
| जेवण | मी जेवण करतो / करते. |
| प्रार्थना | मी प्रार्थना करतो / करते. |
| आंघोळ | मी आंघोळ करतो / करते. |
| नाश्ता | मी नाश्ता करतो / करते. |
| ... | ... |

सराव

## ३ जोड्या लावू या.






| सकाळी | दुपारी | संध्याकाळी | रात्री |
|---|---|---|---|

शब्द संपदा

तुम्ही केव्हा / कधी उठता ? ----------------------

४ **आता असाच रोहनचा दिनक्रम लिहू या...**

५ **आता तुमचा दिनक्रम सांगू या.**

६ **चित्रे पाहून रिकाम्या जागा भरू या.**



रोहन दात घासतो.



रोहन आता दात घासत आहे.



श्रद्धा --------------------



श्रद्धा आता फळ खात आहे.



क्षितिज रोज -------------



क्षितिज आता पोहत आहे.

आनंद --------------------
--------------------------



आनंद आता
पुस्तक वाचत आहे.

## आता ही वाक्ये पाहू या.



रोहन रोज दात घासतो.



रोहन आता दात घासत आहे.



श्रद्धा रोज फळ खाते.



श्रद्धा आता फळ खात आहे.

## अपूर्ण (चालू) वर्तमानकाळ 'खाणे'

| वर्तमानकाळ | अपूर्ण (चालू) वर्तमानकाळ |
|---|---|
| मी अननस खातो.<br>मी अननस खाते. | मी अननस खात आहे. |
| आम्ही / आपण अननस खातो. | आम्ही/आपण अननस खात / खातो आहोत. |
| तू अननस खातोस.<br>तू अननस खातेस. | तू अननस खात / खातो आहेस.<br>तू अननस खात / खाते आहेस. |
| तुम्ही / आपण अननस खाता. | तुम्ही / आपण अननस खात आहात. |
| तो अननस खातो.<br>ती अननस खाते.<br>ते अननस खातं. | तो / ती / ते अननस खात आहे. |
| ते / त्या / ती अननस खातात. | ते / त्या / ती अननस खात आहेत. |

व्याकरण

चालू (अपूर्ण) वर्तमानकाळ
धातू + त + (असणे)
उदा. खाणे - खा + त = खात आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत
वाचणे - वाच + त = वाचत आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत

## अकारान्त अकर्मक धातूंबाबत

थोडक्यात

| | | |
|---|---|---|
| राहत आहे. | बसत आहे. | उठत आहे. |

(राहणे, बसणे, उठणे...)

## अकारान्त सकर्मक धातूंबाबत

| | | |
|---|---|---|
| करत/करीत आहे. | मारत/मारीत आहे. | शोधत/शोधीत आहे. |

(करणे, मारणे, शोधणे...)

| उदा० **शिक्षक/शिक्षिका**<br>मी खातो/ खाते. | उदा० **शिक्षक/शिक्षिका**<br>मी खात आहे. |
|---|---|
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी खातो. | मी खात आहे. |
| मी खाते. | मी खात आहे. |
| आम्ही खातो. | आम्ही खात आहोत. |
| आपण खातो. | आपण खात आहोत. |
| तू खातोस. | तू खात आहेस. |
| तू खातेस. | तू खात आहेस. |
| तुम्ही खाता. | तुम्ही खात आहात. |
| आपण खातो. | आपण खात आहात. |
| तो खातो. | तो खात आहे. |
| ते खातात. | ते खात आहेत. |
| ती खाते. | ती खात आहे. |
| त्या खातात. | त्या खात आहेत. |
| ते खाते/खातं. | ते खात आहे. |
| ती खातात. | ती खात आहेत. |
| ... | ... |

| उदा० **शिक्षक/शिक्षिका**<br>मी गातो/गाते. | उदा० **शिक्षक/शिक्षिका**<br>मी गात आहे. |
|---|---|
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी विचारतो / विचारते. | मी विचारत आहे. |
| मी शिकतो / शिकते. | मी शिकत आहे. |
| मी देतो / देते. | मी देत आहे. |
| मी बघतो / बघते. | मी बघत आहे. |
| मी खेळतो / खेळते. | मी खेळत आहे. |
| मी खातो / खाते. | मी खात आहे. |
| मी धावतो / धावते. | मी धावत आहे. |
| ... | ... |

## ७ खालील तक्ता भरू या.

| क्रियापद | धातू | अपूर्ण वर्तमानकाळ |
|---|---|---|
| तू (करणे) | कर | करत + असणे |
| मी (उठणे) | उठ | उठत आहे |
| तू (खाणे) | खा | ---------- ---------- |
| तुम्ही / आपण (जाणे) | जा | ---------- ---------- |
| तो (गाणे) | गा | ---------- ---------- |
| ती (येणे) | ये | ---------- ---------- |
| ते (होणे) | हो | ---------- ---------- |
| तू (खेळणे) | खेळ | खेळत आहेस |
| तुम्ही (विकणे) | विक | ---------- ---------- |
| आम्ही / आपण दात (घासणे) | घास | ---------- ---------- |
| मी (जेवणे) | जेव | ---------- ---------- |
| तू (बघणे) | बघ | ---------- ---------- |
| ते (बोलणे) | बोल | ---------- ---------- |
| त्या (भरवणे) | भरव | ---------- ---------- |
| ती (वाचणे) | वाच | ---------- ---------- |



## ही माणसं काय करत आहेत?



अ) सलील पाणी पीत आहे.



आ) देवकी कविता लिहीत आहे.



हे लक्षात ठेवा!
अपूर्ण (चालू) वर्तमानकाळात काही धातूंच्या क्रियापदांचे रूप पुढीलप्रमाणे होते :
पिणे - पीत / पिते आहे..., लिहिणे - लिहीत / लिहिते आहे...

## ८ काय घडत आहे ते सांगता येईल?



तो दूध पीत आहे. ------------------------ ------------------------

------------------------ ------------------------

## ९ खालील संवाद ऐकू आणि वाचू या.

★ अगं केतकी, किती मोठ्यानं **वाचतेयस**! जरा हळू वाच की!
★ हळूच **वाचतेय** रे! अजून किती हळू वाचू? एवढा त्रास होत असेल, तर तुझ्या खोलीत जा.
★ तिथे आई वीणा **वाजवतेय.**
★ अरे, मग आई-बाबांच्या खोलीत जा.
★ अगं, बाबा **बोलतायत** फोनवर. कॉन्फरन्स कॉल चालू आहे.
★ मग, तो तुझा जानी दोस्त,केदार, त्याच्याकडे जा ना! एकत्र अभ्यास करा.
★ तो परीक्षा **देत नाहीये.**
★ अरे बाप रे! का?
★ ते नाही माहीत. तो परीक्षा **देत नाहीये,** पण मी **देतोय,** मला अभ्यास **करायचाय,** पण शांतताच **नाहीये** घरात. तुम्ही सगळे आपापली कामं **करताय.** माझा कोणीच विचार करत **नाहीये.**

| लिहिताना | बोलताना |
|---|---|
| वाचत / वाचते आहे | वाचतेय |
| वाचत / वाचते आहेस | वाचतेयस |
| वाजवत / वाजवते आहे | वाजवतेय |
| बोलत आहेत | बोलतायत / बोलताहेत |
| करत आहात | करताय / करताहात |
| देत नाही आहे | देत नाहीये |

## १० चित्र पाहून वाक्यं बनवू या.

१) वाट बघणे २) ट्रेन येणे ३) पळणे ४) चालू ट्रेनमध्ये चढणे ५) गर्दी करणे, धक्काबुक्की करणे
६) जिने चढणे ७) तिकीट काढणे ८) बूट पॉलिश करणे

उदा॰ प्रवासी वाट बघत आहेत...



१) ----------------------------------------

२) ----------------------------------------

३) ----------------------------------------

४) ----------------------------------------

५) ----------------------------------------

६) ----------------------------------------

७) ----------------------------------------

८) ----------------------------------------

# ५ दैनंदिन व्यवहार

| वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान |
|---|---|---|
| **क्रियापद (वाचणे)** | **लिहिताना (औपचारिक)** | **बोलताना (संभाषणात्मक)** |
| मी वाचतो. | मी वाचत / वाचतो आहे. | वाचतो + य = मी वाचतोय |
| मी वाचते. | मी वाचत / वाचते आहे. | वाचते + य = मी वाचतेय |
| आम्ही / आपण वाचतो. | आम्ही / आपण वाचत / वाचतो आहोत. | वाचतो + य = आम्ही / आपण वाचतोय<br>वाचतो + होत = आम्ही / आपण वाचताहोत |
| तू वाचतोस. | तू वाचत / वाचतो आहेस. | वाचतो + यस = तू वाचतोयस |
| तू वाचतेस. | तू वाचत / वाचते आहेस. | वाचते + यस = तू वाचतेयस |
| तुम्ही / आपण वाचता. | तुम्ही / आपण वाचत / वाचता आहात. | वाचता + य = तुम्ही / आपण वाचताय<br>वाचता + हात = तुम्ही / आपण वाचताहात |
| तो वाचतो. | तो वाचत / वाचतो आहे. | वाचतो + य = तो वाचतोय |
| ते वाचतात. | ते वाचत आहेत. | वाचता + यत = ते वाचतायत<br>वाचता + हेत = ते वाचताहेत |
| ती वाचते. | ती वाचत / वाचते आहे. | वाचते + य = ती वाचतेय |
| त्या वाचतात. | त्या वाचत आहेत. | वाचता + यत = त्या वाचतायत<br>वाचता + हेत = त्या वाचताहेत |
| ते वाचतं. | ते वाचत / वाचते आहे. | वाचतं + य = ते वाचतंय |
| ती वाचतात. | ती वाचत आहेत. | वाचता + यत = ती वाचतायत<br>वाचता + हेत = ती वाचताहेत |

व्याकरण

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी खात आहे. | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी खातेय. |
|---|---|
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी खात आहे. | मी खातोय. |
| मी खात आहे. | मी खातेय. |
| आम्ही खात आहोत. | आम्ही खातोय. |
| आपण खात आहोत. | आपण खातोय. |
| तू खात आहेस. | तू खातोयस. |
| तू खात आहेस. | तू खातेयस. |
| तुम्ही खात आहात. | तुम्ही खाताय. |
| आपण खात आहात. | आपण खाताय. |
| तो खात आहे. | तो खातोय. |
| ते खात आहेत. | ते खातायत. |
| ती खात आहे. | ती खातेय. |
| त्या खात आहेत. | त्या खातायत. |
| ते खात आहे. | ते खातंय. |
| ती खात आहेत. | ती खातायत. |
| ... | ... |

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** मी आम्ही खात आहोत. | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** आम्ही खातोय. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| आम्ही विचारत आहोत. | आम्ही विचारतोय. |
| आम्ही शिकत आहोत. | आम्ही शिकतोय. |
| आम्ही बघत आहोत. | आम्ही बघतोय. |
| आम्ही पोहत आहोत. | आम्ही पोहतोय |
| आम्ही गात आहोत. | आम्ही गातोय. |
| आम्ही धावत आहोत. | आम्ही धावतोय. |
| आम्ही विकत आहोत. | आम्ही विकतोय. |
| ... | ... |

## ११ आता पुढील संवाद वाचून प्रश्नांची उत्तरे लिहू या.



**फोनवर :**

**सोनल** : हॅलो, प्रभा आहे का ? मी तिची मैत्रीण सोनल बोलतेय.

**आई** : कोण, सोनल का ? कशी आहेस बेटा तू ? प्रभा अभ्यास करतेय. परीक्षा चालू आहे ना ! तुझा झाला का अभ्यास ?

**सोनल** : नाही काकू, मीही गणिताचाच अभ्यास करतेय...

**प्रभा काय करत आहे ? -** प्रभा अभ्यास करत आहे.

**गणिताचा अभ्यास कोण करीत आहे ?** ----------------------------

**तुम्ही काय करत आहात ?** ----------------------------------------



## १२ संवाद वाचू या आणि क्रियापद ओळखू या.



**हॉटेलमध्ये :**

**मुग्धा** : माझ्या आईचा एसएमएस आलाय. ती मला घरी बोलावतेय.

**सुधा** : अगं, सांग ना आईला, आपण अजून खातोय.

**मुग्धा** : बघ ! आता तर तिचा फोन येतोय.

## १३ पुढील संभाषणे वाचून रिकाम्या जागी योग्य क्रियापदे भरू या.

**क. घरात :**

**(करतेय, बघतेय, वाचतेय, करतेयस)**

**बाबा :** नीता, आई काय -------------------- ?

**नीता :** आई पुस्तक ---------------------- .

**बाबा :** अगं, मग तू काय -------------------- ?

**नीता :** मी ना ? मी तर टी. व्ही. -------------- .

**ख. शाळेत :**

**(करतायत / म्हणतायत / वाटतंय)**

**जुलिया :** ती मुलं कोणतं गाणं गातायत ?

**अवंती :** ती भारताचं राष्ट्रगीत ---------------- . उद्या १५ ऑगस्ट आहे ना, म्हणून मुलं सराव --------------------- .

**जुलिया :** किती छान -------------------- ना, ऐकताना !

**ग. मैदानावर :**

**(पडतोय, मारतोय, सांगतोय, विचारतोयस, पकडतोय)**



**थॉमस :** ही मुलं कुठला खेळ खेळतायत?

**अभय :** याला ''बैठा खो-खो'' म्हणतात. ''खो-खो''चे दोन प्रकार आहेत. ''उभा खो-खो'' आणि ''बैठा खो-खो''

**थॉमस :** अरे, तो बघ, तो मुलगा ---------------------!

**अभय :** अरे, नाही, तो पडत नाहीये. तो दुसऱ्या मुलाला ------------------.

**थॉमस :** पण तो त्याला का ---------------------?

**अभय :** अरे, तेच ----------- मी तुला, तो त्याला मारत नाहीये. तो त्याला पकडतोय.

**थॉमस :** तो त्याला का पकडतोय?

**अभय :** किती प्रश्न ---------------------! चल, खेळू या.

## १४ बाजारात



**अमोघ :** अगं, ते बघ तिकडे. फळवाल्याकडे. हत्ती केळी खातोय.

**साधना :** हो रे!

**अमोघ :** तो बघ, तो लहान मुलगा किती मस्ती करतोय.

**साधना :** त्याची आई त्याला ओरडतेय...

**बाजारात काय काय घडत आहे? आता लिहू या.**

हत्ती केळी खात आहे. ----------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

**थोडक्यात**

----------- + वाला
सायकल + वाला = सायकलवाला
केळीवाला, फळवाला, दूधवाला

----------- + वाली
भाजी + वाली = भाजीवाली
केळीवाली, फळवाली, दूधवाली

## १५ पुढील रचना वाक्यात वापरून पाहू या.

**(ढग गडगडणे, विजा चमकणे, सोसाट्याचा वारा वाहणे, झाडे डोलणे ...)**

**पावसात**

जुईली, तन्वी, निकिता, नेहा सगळ्या जणी लवकर लवकर बाहेर या! मस्त पाऊस पडतोय आणि आकाशात सप्तरंगी इंद्रधनुष्य दिसतंय. चला, रिमझिम पावसात भिजू या. ते बघा, आपल्यासारखे पक्षीही झाडावर भिजतायत आणि ते थंडीने कुडकुडतायत. पानांतून पाण्याचे थेंब टपटपतायत. अरे बाप रे! पाऊस वाढत चाललाय.

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

## १६ टी.व्ही.वरील बातम्या ऐकू या.

आता वळू या पुढील बातम्यांकडे. आज मुंबईत सर्व ठिकाणी पाऊस पडत आहे. आपण काही ठिकाणांची दृश्ये पाहू या.

आपण बघत आहात वरळी सी-फेसचे दृश्य. आपण पाहत आहात, माणसं पावसाचा आनंद कशी लुटत आहेत. ती पावसात मनसोक्त भिजत आहेत. मुलं पाण्यात होड्या सोडत आहेत. काही जण भजी व कणसं खाऊन मजा लुटत आहेत. अतिशय छान दृश्य आपल्याला पाहायला मिळत आहे.

आता पाहू या मीलन सबवेचे दृश्य. इथे खूप पाणी साचत आहे. वाहतुकीची कोंडी होत आहे. रस्त्यांवर खड्डे आहेत. बस, गाड्या हळूहळू बंद पडत आहेत. पावसाचा जोर वाढतच आहे.

हे बघा, हिंदमाता येथे काय घडत आहे. लोकांना घरी जायला त्रास होत आहे. काही घरांमध्ये पाणी शिरत आहे. डासही त्रास देत आहेत. लोकांचे हाल होत आहेत. तरीही काही जणं पावसाची मजा घेत आहेत. तरूण मुलं-मुली छान भिजत आहेत.

## १७ या बातम्या चुकून औपचारिक भाषेत आहे. त्या बोली भाषेत लिहू या.

आज मुंबईत सर्व ठिकाणी पाऊस पडतोय...

## वाचू या.



हा आपला रोहित. रोहित आंबा खात आहे. तो पाहा रोहितचा लाडका मित्र, विशाल. तो आंबा खात नाही आहे. तो टी.व्ही. पाहत आहे. ती विशालची मैत्रीण नेहा. ती टी.व्ही. पाहत नाही आहे. ती अभ्यास करत आहे. आणि हा मी. हा माझा मित्र साहिल. आम्हीही टी.व्ही. पाहत नाही आहोत.

आम्ही बुद्धिबळ खेळत आहोत. स्वयंपाकघरामध्ये रोहितची आई आहे. ती टी.व्ही. ही पाहत नाही आहे, किंवा बुद्धिबळही खेळत नाही आहे. ती स्वयंपाक करत आहे आणि रेडिओ ऐकत आहे. हॉलमध्ये रोहितचे बाबा आणि रोकडेकाका आहेत. रोकडेकाका बाहेर जात आहेत. रोहितचे बाबा मात्र बाहेर जात नाही आहेत. ते कॅलेंडरकडे पाहत आहेत. ते नेहाच्या लग्नाची तारीख ठरवत आहेत.

आजी वर्तमानपत्र वाचत आहेत. ''आजी, तुम्ही नेहमी जाहिराती का बघता?'' ''कुठल्या जाहिराती? मी तर बातम्या वाचतेय.''

| | | |
|---|---|---|
| रोहित आंबा खात आहे | ⟷ | विशाल आंबा खात नाही आहे |
| आम्ही टी.व्ही. पाहत नाही आहोत | ⟷ | आम्ही बुद्धिबळ खेळत आहोत |
| नेहा अभ्यास करत आहे | ⟷ | नेहा टी.व्ही. पाहत नाही आहे |
| रोहितची आई बुद्धिबळ खेळत नाही आहे | ⟷ | रोहितची आई रेडिओ ऐकत आहे |
| रोकडेकाका बाहेर जात आहेत | ⟷ | बाबा बाहेर जात नाही आहेत |
| आजी रेडिओ ऐकत नाही आहे | ⟷ | आजी बातम्या वाचत आहे |

थोडक्यात

**नकारार्थी चालू / अपूर्ण वर्तमानकाळ**
खाणे = खात + नाही + आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत...

| होकारार्थी | नकारार्थी / लिहिताना | नकारार्थी / बोलताना |
|---|---|---|
| मी आंबा खात आहे. | मी आंबा खात नाही आहे. | मी आंबा खात नाहीये. |
| आम्ही / आपण आंबा खात आहोत. | आम्ही / आपण आंबा खात नाही आहोत. | आम्ही / आपण आंबा खात नाहीयोत. |
| तू टी.व्ही. पाहत आहेस. | तू टी.व्ही. पाहत नाही आहेस. | तू टी.व्ही. पाहत नाहीयेस. |
| तुम्ही / आपण टी.व्ही. पाहत आहात. | तुम्ही / आपण टी.व्ही. पाहत नाही आहात. | तुम्ही / आपण टी.व्ही. पाहत नाहीआत. |
| तो बुद्धिबळ खेळत आहे. | तो बुद्धिबळ खेळत नाही आहे. | तो बुद्धिबळ खेळत नाहीये. |
| ते बातम्या वाचत आहेत. | ते बातम्या वाचत नाही आहेत. | ते बातम्या वाचत नाहीयेत. |
| ती बुद्धिबळ खेळत आहे. | ती बुद्धिबळ खेळत नाही आहे. | ती बुद्धिबळ खेळत नाहीये. |
| त्या आरडाओरडा करत आहेत. | त्या आरडाओरडा करत नाही आहेत. | त्या आरडाओरडा करत नाहीयेत. |
| ते जेवण शिजवत आहे. | ते जेवण शिजवत नाही आहे. | ते जेवण शिजवत नाहीये. |
| ती गोंगाट करत आहेत. | ती गोंगाट करत नाही आहेत. | ती गोंगाट करत नाहीयेत. |

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| मी जेवतो. | मी जेवत नाही आहे. |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| मी जेवतो. | मी जेवत नाही आहे. |
| मी जेवते. | मी जेवत नाही आहे. |
| आम्ही जेवतो. | आम्ही जेवत नाही आहोत. |
| आपण जेवतो. | आपण जेवत नाही आहोत. |
| तू जेवतोस. | तू जेवत नाही आहेस. |
| तू जेवतेस. | तू जेवत नाही आहेस. |
| तुम्ही जेवता. | तुम्ही जेवत नाही आहात. |
| आपण जेवता. | आपण जेवत नाही आहात. |
| तो जेवतो. | तो जेवत नाही आहे. |
| ते जेवतात. | ते जेवत नाही आहेत. |
| ती जेवतो. | ती जेवत नाही आहे. |
| त्या जेवतात. | त्या जेवत नाही आहेत. |
| ते जेवते / जेवतं. | ते जेवत नाही आहे. |
| ती जेवतात. | ती जेवत नाही आहेत. |
| ... | ... |

सराव

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| मी खेळतोय. | मी खेळत नाहीये. |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
|---|---|
| मी खेळतोय. | मी खेळत नाहीये. |
| मी खेळतेय. | मी खेळत नाहीये. |
| ती खेळतेय. | ती खेळत नाहीये. |
| ते खेळतेय. | ते खेळत नाहीये. |
| तो खेळतोय. | तो खेळत नाहीये. |
| त्या खेळताहेत. | त्या खेळत नाहीयेत. |
| ती खेळताहेत. | ती खेळत नाहीयेत. |
| आम्ही/आपण खेळताहोत. | आपण खेळत नाहीयोत. |
| आपण खेळताहात. | आपण खेळत नाहीआत. |
| तू खेळतोयस. | तू खेळत नाहीयेस. |
| तुम्ही खेळताहात. | तुम्ही खेळत नाहीआत. |
| तू खेळतेयस. | तू खेळत नाहीयस. |
| ... | ... |

**१८** **आता खालील चित्रे पाहून पुढील वाक्ये चूक की बरोबर, ते लिहू या. चुकीची वाक्ये सुधारता येतील का?**

**ऑफिसमध्ये :**




१. सुनीता कॉम्प्युटरवर काम करत आहे. --------------------------------------------

२. मनीषा लिहीत आहे. --------------------------------------------

३. प्रतीक चालत नाही आहे. --------------------------------------------

४. साहेब शिपायाला बोलावत आहेत. --------------------------------------------

५. शिपाई चहा नेत आहे. --------------------------------------------

६. अभिषेक चहा पीत नाही आहे. --------------------------------------------

७. भास्कर बसत आहे. --------------------------------------------

८. एक बाई अर्ज भरत आहे. --------------------------------------------

९. शंभू पैसे घेत आहे. --------------------------------------------

## १९ ऐकू या आणि वाचू या.

**लेडिज स्पेशल**
अरे बापरे! किती गर्दी!
मी काही ही ट्रेन पकडत नाहीये,
आणि दरवाजातल्या मुली ढिम्म हलत नाहीयेत.
चढायचं कसं?
काय करायचं? उशीर होतोय.
जाऊ दे, मी ही ट्रेन पकडतेच,
काय होईल ते होईल.
हुश्श! चढले बाई एकदाची!
अरे, मागून कोण ढकलतंय मला?
कुणी आत का जात नाहीये?
दारात गर्दी वाढतेय.
आणि त्यात हे फेरीवाले.
अहो, हा बायकांचा डबा आहे!
स्पेशल! लेडिज स्पेशल!
पण हे मी कोणाला सांगतेय?
कोण ऐकतंय माझं?





## २० ऐकू या आणि वाचू या.

**मयेकर :** वा म्हात्रेसाहेब, उद्या नाशिकला जाताहात ना?
**म्हात्रे :** चुकत आहात बरं! या खेपेला मात्र साफ चुकताहात.
**मयेकर :** ते कसं काय!
**म्हात्रे :** कारण मी नाशिकला नाही, पुण्याला जातोय.
**मयेकर :** अच्छा! पुण्याला काय दगडूशेठ गणपतीच्या दर्शनाला जाताय की काय? पेढे आणा मग येताना प्रसादाचे!
**म्हात्रे :** छे हो! माझा मुलगा राहतोय ना तिथे, आदित्य, त्याच्याकडे जातोय.
**मयेकर :** का हो, सहजच ना, की काही विशेष?
**म्हात्रे :** विशेषच. अहो, लेक लग्न करतोय!
**मयेकर :** वा वा! मुलगी कुठली?
**म्हात्रे :** पुण्याचीच, दाबक्यांची मुलगी आहे. सध्या एम्.बी.ए. चा अभ्यास करतेय.
**मयेकर :** वा वा, छान! सून येतेय म्हणजे तुम्ही आता सासरेबुवा होताहात. आता पेढे नकोत, लाडूच पाहिजेत. दर्शनाला न जाताच दगडूशेठ पावला म्हणायचा!

संवाद

## २१ वरील संवाद वाचून चूक की बरोबर ते सांगाल?

१. श्री. म्हात्रे नाशिकला जात आहेत. ☐
२. आदित्य आता लग्न करत आहे. ☐
३. आदित्य पुण्यात राहत आहे. ☐
४. श्री. म्हात्रे एम.बी.ए.चा अभ्यास करत आहेत. ☐
५. मयेकरांचा मुलगा येत आहे. ☐

**इंग्रजीप्रमाणेच मराठीतही भविष्यकाळासाठी चालू वर्तमानकाळ वापरला जातो**
**उदा.** उद्या मी तुला भेटायला येत आहे / येतोय / येते आहे / येतेय.
पुढील महिन्यात मी लंडनला जात आहे / जातो आहे / जातोय.
लवकरच आम्ही लग्न करत आहोत / करतो आहोत / करतोय.

व्याकरण

## १ ते ५० अंक - वाचन आणि सराव.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | ११ | अकरा | २१ | एकवीस | ३१ | एकतीस | ४१ | एकेचाळीस |
| २ | दोन | १२ | बारा | २२ | बावीस | ३२ | बत्तीस | ४२ | बेचाळीस |
| ३ | तीन | १३ | तेरा | २३ | तेवीस | ३३ | तेहतीस | ४३ | त्रेचाळीस |
| ४ | चार | १४ | चौदा | २४ | चोवीस | ३४ | चौतीस | ४४ | चव्वेचाळीस |
| ५ | पाच | १५ | पंधरा | २५ | पंचवीस | ३५ | पस्तीस | ४५ | पंचेचाळीस |
| ६ | सहा | १६ | सोळा | २६ | सव्वीस | ३६ | छत्तीस | ४६ | शेहेचाळीस |
| ७ | सात | १७ | सतरा | २७ | सत्तावीस | ३७ | सदतीस | ४७ | सत्तेचाळीस |
| ८ | आठ | १८ | अठरा | २८ | अठ्ठावीस | ३८ | अडतीस | ४८ | अठ्ठेचाळीस |
| ९ | नऊ | १९ | एकोणीस | २९ | एकोणतीस | ३९ | एकोणचाळीस | ४९ | एकोणपन्नास |
| १० | दहा | २० | वीस | ३० | तीस | ४० | चाळीस | ५० | पन्नास |

### २२ चला, हे कोडे सोडवू या.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१ | | | | स |
| | | | | | | |
| २९ | | को | | | | |
| | | ३५ | | स्ती | | |
| | ५० | प | | | | |
| | ३० | ती | | | | |

### २३ मुंबई मराठी साहित्य संघ

नमस्कार, मुंबई मराठी साहित्य संघ. हवा असलेला विस्तारित क्रमांक डायल करा. २१ आणि २२ - प्रमुख कार्यालय., २४ - साहित्य शाखा., २७ - नाट्यकार्यालय, ३५ - अखिल भारतीय साहित्य महामंडळ. धन्यवाद!

### २४ खालील तक्ता भरू या.

| कोणता क्रमांक ? | कुठले कार्यालय ? |
|---|---|
| २१ | ---------------------- |
| २२ | ---------------------- |
| --------- | साहित्य शाखा |
| २७ | ---------------------- |
| --------- | ---------------------- |

### २५ दिनदर्शिका पाहून वार लिहिता येतील?





| | |
|---|---|
| ३० बुधवार | १५ -------------- |
| ४ -------------- | १८ -------------- |
| १२ शनिवार | २७ -------------- |
| १४ -------------- | ९ -------------- |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>आज रविवार आहे का ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>नाही, उद्या रविवार आहे./<br>नाही, आज शनिवार आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| आज सोमवार आहे का ? | नाही, उद्या सोमवार आहे./<br>नाही, आज रविवार आहे. |
| आज मंगळवार आहे का ? | नाही, उद्या मंगळवार आहे./<br>नाही, आज सोमवार आहे. |
| आज बुधवार आहे का ? | नाही, उद्या बुधवार आहे./<br>नाही, आज मंगळवार आहे. |
| आज गुरुवार आहे का ? | नाही, उद्या गुरुवार आहे./<br>नाही, आज बुधवार आहे. |
| आज शुक्रवार आहे का ? | नाही, उद्या शुक्रवार आहे./<br>नाही, आज गुरुवार आहे. |
| आज शनिवार आहे का ? | नाही, उद्या शनिवार आहे./<br>नाही, आज शुक्रवार आहे. |

सराव

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुम्ही पोहता का ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मी पोहत नाही. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| तुम्ही खेळता का ? | मी खेळत नाही. |
| तुम्ही झोपता का ? | मी झोपत नाही. |
| तुम्ही गाता का ? | मी गात नाही. |
| तुम्ही बोलावता का ? | मी बोलावत नाही. |
| तुम्ही येता का ? | मी येत नाही. |
| तुम्ही जाता का ? | मी जात नाही. |

## २६ खालील तिकिटांचे निरीक्षण करून त्यावरील किंमत शब्दांत लिहू या.




------------------------    ------------------------    ------------------------

## २२ जोड्या जुळवू या.

| तिकिटावरील माहिती | माहितीचा अर्थ |
|---|---|
| १) ₹ १०.०० | क) तारीख |
| २) ०८ / ०८ / २०१३ | ख) तिकिटाचा प्रकार |
| ३) साधारण | ग) बसमार्ग |
| ४) वाकोला पोलीस ठाणे ते कुर्ला आगार | घ) किंमत रुपये |
| ५) फुल | च) प्रौढांसाठी तिकिटाचा प्रकार |
| ६) बेस्ट | छ) बससेवेचे नाव |

## वाचू या ... चिंटू.




## म्हणी / वाक्प्रचार

तीन-तेरा वाजणे
सोळावं वरीस धोक्याचं
सतरा ठिकाणी फिरणे
छत्तीसचा आकडा
बत्तीशी दाखवणे
अठरा विश्वे दारिद्र्य






## खेळा आणि शिका

१. खालील क्रियापदांसाठी तक्ते बनवून खेळ खेळू या. प्रत्येक गटाने क्रियापदांची वाक्ये बनवायची. जो गट जास्तीत जास्त अचूक वाक्ये बनवील, तो गट जिंकेल.
बोलणे, करणे, खाणे, हसणे, गाणे, ऐकणे, चालणे, रडणे, ओरडणे, सांगणे, विचारणे...

## ईकारान्त सामान्य नामे

### पुल्लिंगी सामान्य नामे

ई - ई

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| तो व्यापारी | ते व्यापारी |
| तो विद्यार्थी | ते विद्यार्थी |
| तो हत्ती | ते हत्ती |
| तो दूरध्वनी | ते दूरध्वनी |

याचप्रमाणे :
पती, पक्षी, कर्मचारी, शिपाई, शेतकरी...

**नपुंसकलिंगी सामान्य नामांची एकवचनी रूपेच वापरली जातात :** दही, लोणी, पाणी...

### स्त्रीलिंगी सामान्य नामे

ई - ई

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ती पत्नी | त्या पत्नी |
| ती गृहिणी | त्या गृहिणी |
| ती विद्यार्थिनी | त्या विद्यार्थिनी |
| ती अभिनेत्री | त्या अभिनेत्री |



### स्त्रीलिंगी सामान्य नामे

ई - या

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ती आई | त्या आया |
| ती बाई | त्या बाया/बायका |
| ती बातमी | त्या बातम्या |
| ती भाजी | त्या भाज्या |
| ती मिठाई | त्या मिठाया |
| ती मिशी | त्या मिश्या |
| ती वही | त्या वह्या/वह्या |

याचप्रमाणे :
नदी, गाडी, साडी, शिटी, कडी, किल्ली, चटई, कढई...

### स्त्रीलिंगी सामान्य नामे

ई - इया

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| ती स्त्री | त्या स्त्रिया |
| ती बी | त्या बिया |
| ती फी | त्या फिया |

## २३ खालील शब्द योग्य चौकोनात लिहू या.

(मिश्या, विद्यार्थिनी, ~~अभिनेत्री~~, पाणी, नदी, कडी, साड्या, हत्ती, ~~मिठाया~~, ~~विद्यार्थी~~, किल्ली, गृहिणी, कड्या, ~~मिशी~~)

| एकवचन | एकवचन/अनेकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| मिशी | अभिनेत्री | मिठाया |
| विद्यार्थी | ----------------- | ----------------- |
| ----------------- | ----------------- | ----------------- |



## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो व्यायाम (ते -) | ती प्रार्थना (त्या -) | ते गणित (ती गणिते) |
| तो नाश्ता (ते नाश्ते) | ती अंघोळ (त्या अंघोळी) | ते इंद्रधनुष्य (ती इंद्रधनुष्ये) |
| तो दिनक्रम (ते -) | ती परीक्षा (त्या -) | ते स्वयंपाकघर (ती स्वयंपाकघरे) |
| तो हत्ती (ते -) | ती थंडी | ते लग्न (ती लग्ने) |
| तो फळवाला (ते फळवाले) | ती वीज (त्या विजा) | ते बुद्धीबळ (ती बुद्धीबळे) |
| तो पाऊस | ती कसोटी (त्या कसोट्या) | |
| तो थेंब (ते -) | ती होडी (त्या होड्या) | |
| तो ढग (ते -) | ती बातमी (त्या बातम्या) | |
| तो वारा (ते वारे) | ती भाजी (त्या भाज्या) | |
| तो सामना ( ते सामने) | ती मिठाई (त्या मिठाया) | |
| तो अंदाज (ते -) | ती मिशी (त्या मिश्या) | |
| | ती नदी (त्या नद्या) | |
| | ती गाडी (त्या गाड्या) | |
| | ती साडी (त्या साड्या) | |
| | ती शिटी (त्या शिट्या) | |
| | ती कडी (त्या कड्या) | |
| | ती किल्ली (त्या किल्ल्या) | |

| क्रियापद | विशेषण | शिष्टाचार शब्द | प्रश्नशब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|---|
| उठणे | लाडका | अरे बाप रे! | केव्हा | सकाळी |
| घेणे | सोसाट्याचा | जरा ... | कधी | दुपारी |
| जाणे | | बघ! | | संध्याकाळी |
| फिरणे | | किती छान! | | रात्री |
| जेवणे | | | | लवकर |
| पोहणे | | | | मोठ्याने |
| मारणे | | | | |
| धावणे | | | | |
| भिजणे | | | | |
| पडणे | | | | |
| कुडकुडणे | | | | |
| गडगडणे | | | | |
| चमकणे | | | | |
| वाहणे | | | | |
| डोलणे | | | | |
| वर्तवणे | | | | |



## आता मला हे येतं.

**स्वतःचा आणि इतरांचा दिनक्रम सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी वार**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**१३ ते ५० अंक**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**दैनंदिन व्यवहारातील गोष्टींविषयी बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**दिवसाच्या वेळा**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : केव्हा / कधी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

